# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 08/04/2023 (शनिवार) सायंकाळ

---

### जबर दुखापत

पो.स्टे. सावनेर :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील गोल बाजार सावनेर येथे दिनांक ०७/०४/२०२३ चे १४/०७ वा. दरम्यान फिर्यादी नामे— दशरथ छोटेलाल मेहंदोले, वय ४२ वर्ष, रा. सर्वोदयनगर पाणीटाकी जवळ सावनेर याने आपले गोल बाजार सावनेर येथे आलू कांदयाचे दुकान लावून आपल्या दुकानात हजर असता सौ. छाया मेहंदोले हिचा पहिला पती **आरोपी नामे— चुडामन महादेव ठाकरे, वय ४५ वर्ष, रा. वार्ड क्र. १२ ढिवा मोहल्ला सावनेर** हा फिर्यादीचे आलु कांदयाचे दुकानात दारू पिवून आला व म्हणाला की ''तु माझे पत्नीला तुझ्या सोबत पत्नी म्हणून का ठेवले'' असे म्हणून फिर्यादी सोबत शाब्दीक वादविवाद करू लागला फिर्यादीने त्याला विचारले कि मला का शिवीगाळ करत आहेस व तु माझे घरी का गेला होता यावरून त्याने कमरेतुन लोखंडी पाते असलेली सुरी काढून फिर्यादीचे डावे भागाचे छातीचे खाली पोटावर व नाभीचे वर मारून जखमी केले. त्यावेळी तेथे हजर असलेले बेकरीचे दुकान मालक राजु व बाजुचा आटाचक्की मालक मोहन यांनी झगडा भांडण सोडवले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३२६, ५०४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा/१५४६ राजेश हावरे मो. नं. ९९२३३६५६२२ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर